ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २८२ • शुक्रवार दि.७ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

### पीक कर्ज तातडीने देण्याचे बँकांना मुख्यमंत्र्यांचे निर्देश

## शेतकरी कर्जमाफीचा पहिला हप्ता वितरित




मुंबई/प्रतिनिधी-राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने' अंतर्गत कर्जमाफीच्या पहिल्या टप्प्याला शुक्रवारी सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका क्लिकद्वारे ६ लाख २२ हजार पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२९ कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित केली. आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यांवर ही रक्कम थेट जमा करण्यात आली.

कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्य शासनाने सर्व बँकांना दिले आहेत. त्यामुळे कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळणार आहे.पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण होताच त्यांच्या खात्यांवरही कर्जमाफीची रक्कम टप्प्याटप्प्याने जमा केली जाणार असल्याची माहिती शासनाने दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, कर्जमाफीसाठी कोणताही अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ग्रामपंचायतींकडे पाठविण्यात आलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या यादीनुसार शेतकऱ्यांनी केवळ आधार क्रमांक बँक खात्याशी जोडून प्रमाणीकरण करावे.एनपीएवरील अतिरिक्त व्याजामुळे काही खात्यांमध्ये कर्जाची रक्कम वाढून दिसत होती. शासनाच्या सूचनेनुसार बँकांनी हे अतिरिक्त व्याज रद्द केल्याने शासनाने जमा केलेली रक्कम आणि थकीत कर्जाची रक्कम समान झाली असून संबंधित शेतकऱ्यांची कर्जखाती पूर्णपणे शून्य झाली आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.सध्या राज्यातील १८ ते १८ लाख कर्जखात्यांची पडताळणी सुरू असून, सुमारे १२ लाख खात्यांमध्ये नावांतील तफावत, तांत्रिक त्रुटी किंवा दुबार नोंदी आढळल्याने ती प्रकरणे दुरुस्तीसाठी बँकांकडे पाठविण्यात आली आहेत. त्रुटी दूर होताच उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ दिला जाणार आहे.योजनेत वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) लागू नसल्याने लाभार्थी शेतकऱ्यांना सिबिल गुणांकनाची कोणतीही अट लागू होणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## पंतप्रधान मोदी-शिंदे यांच्यात 'विकासा'वर संवाद

### राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा



नवी दिल्ली:महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी संसद भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन जवळपास तासभर विविध विषयांवर चर्चा केली. महाराष्ट्रातील विकासकामे, संसदेतील कामकाज, नव्याने निवडून आलेले खासदार आणि विकसित भारत २०४७ या संकल्पनेवर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाल्याची माहिती शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अलीकडेच ठाकरे गटातील सहा खासदारांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर लगेचच एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदींची घेतलेली भेट राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात असून, या घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात विविध चर्चांना उधाण आले आहे.बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःहून मला चहासाठी बोलावले होते. या भेटीत विविध राष्ट्रीय तसेच महाराष्ट्राशी संबंधित विषयांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. नव्या पिढीतील पान ४ वर

## जेन-झीला देशप्रेमासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची गरज नाही-प्रियंका गांधी

नवी दिल्ली:राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या 'जेन-झी' विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादानंतर काँग्रेसने संघ आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. जनरेशन झेडला मोहन भागवत यांच्या कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नाही. विद्यार्थ्यांची खरोखरच काळजी असेल तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राजीनामा द्यावा किंवा किमान संसदेत येऊन विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसच्या खा. प्रियांका गांधी यांनी केली.

६ ऑगस्ट रोजी मोहन भागवत यांनी तरुण विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर भूमिका मांडली होती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने संघाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस तथा खासदार के. सी. वेणुगोपाल यांनीही सरकार आणि आरएसएसवर टीकेची झोड उठवली. सरकारवर आरएसएसचे नियंत्रण असल्याचा दावा केला जातो. जर संघाला विद्यार्थ्यांची खरंच चिंता असेल, तर त्यांच्यावर झालेल्या कथित अत्याचारांचा निषेध त्यांनी करायला हवा. पेपरफुटी प्रकरणात जबाबदारीची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पेलेट गनचा वापर करण्यात आला. या गंभीर मुद्द्यावर मोहन भागवत मौन का बाळगतात? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. वेणुगोपाल यांनी पुढे आरोप केला की, विद्यार्थ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ संवादाचे कार्यक्रम आयोजित करणे हा निव्वळ दिखावा असून, विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या मागण्यांवर सरकार आणि संघाने स्पष्ट भूमिका घ्यावी.मोहन भागवत यांच्या 'जेन-झी' संवादानंतर राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## रस्त्यावरुन मनपा व जागा मालकात वाद




नांदेड/प्रतिनिधी-मयुरविहार कॉलनी लगत असलेल्या वस्तीत रस्ता करण्यावरुन आज सकाळी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे पथक व जागा मालकात मोठा वाद झाला. पोलीस आणि यंत्रसामुग्रीद्वारे मनपाने विवादीत जागी रस्त्याचे काम अखेर सुरु केले आहे.

शहरातील मयुरविहार कॉलनीच्या पूर्वेस रस्ता करण्यावरुन गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे. लगत असलेली जागा ही व्यापारी सुधाकर टाक यांच्या मालकीची असल्याचा त्यांचा दावा आहे. मनपा निवडणूक काळात रस्त्याच्या मागणीसाठी या भागातील नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार व्यक्त केला होता. त्यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी संबंधीत नागरिकांशी चर्चा करुन रस्त्याचा प्रश्न लवकरच निकाली काढू असे वचन दिले होते. आज नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या एका पथकाने रस्त्याच्या कामाला सुरुवात केली असता सुधाकर टाक यांनी जोरदार आक्षेप घेतला. याच दरम्यान पोलीस, मनपा प्रशासन आणि टाक यांच्यात काही काळ शाब्दीक बाचाबाची झाल्यानंतर वातावरणात तणाव निर्माण झाला होता. मनपा प्रशासनाने पोलीस संरक्षणात रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

## राज ठाकरेंकडून सुवर्णपदक विजेत्या गावीतची दिलगिरी





नाशिक:राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक पटकावणारे धावपटू दिलीप गावित आणि त्यांचे प्रशिक्षक वैजनाथ काळे यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीसाठी तब्बल दोन ते अडीच तास प्रतीक्षा करावी लागल्याच्या घटनेनंतर निर्माण झालेल्या वादावर अखेर राज ठाकरे यांनी स्पष्टीकरण देत दिलगिरी व्यक्त केली आहे. दिलीप गावित आले होते, याची मला माहितीच नव्हती. माहिती असती तर मी नक्कीच त्यांची भेट घेतली असती, असे स्पष्ट करत त्यांनी गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला.

गुरुवारी नाशिक दौऱ्यावर असताना राज ठाकरे ज्या ठिकाणी मुक्कामी होते, तेथे नियोजित भेटीसाठी दिलीप गावित आणि त्यांचे प्रशिक्षक वैजनाथ काळे पोहोचले होते. मात्र, सुमारे दोन ते अडीच तास प्रतीक्षा करूनही भेट न झाल्याने दोघांनी नाराजी व्यक्त करत कोणालाही न भेटता तेथून प्रस्थान केले. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज ठाकरे यांच्यावर विविध स्तरांतून टीकेची झोड उठली.या पार्श्वभूमीवर शुक्रवारी आयोजित पत्रकार पान ४ वर

## एससी-एसटी आरक्षणात 'क्रिमी लेयर' नाही : केंद्राची सर्वोच्च न्यायालयात भूमिका

नवी दिल्ली : अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाला 'क्रिमी लेयर'चे तत्त्व लागू होत नसल्याची स्पष्ट भूमिका केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात मांडली आहे. या संदर्भातील जनहित याचिकांना विरोध करताना सरकारने विद्यमान कायद्यात एससी-एसटींसाठी 'क्रिमी लेयर'ची कोणतीही तरतूद नसल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले.

केंद्राने म्हटले आहे की, 'क्रिमी लेयर'ची संकल्पना केवळ ओबीसी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी लागू असून, एससी-एसटींची ओळख ऐतिहासिक व सामाजिक मागासलेपणाच्या आधारे करण्यात आली आहे. तसेच अनुसूचित जाती-जमातींच्या यादीत बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच असल्याचे सरकारने स्पष्ट केले. दरम्यान, ओबीसी आरक्षणावरील एका सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने, दोन्ही पालक आयएएस अधिकारी असतील, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ का मिळावा? असा प्रश्न उपस्थित केल्याने आरक्षणातील 'क्रिमी लेयर'चा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक;एकजण ठार

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरातील समतानगर परिसरातील रस्त्यावर गुरुवारी रात्री भरधाव वेगातील ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.

समतानगर भागातील रस्त्यावरुन संभाजी वाघमारे समराळेकर हे दुचाकीवर जात असतांना रात्री साडेआठच्या सुमारास भरधाव वेगातील ट्रक क्र.एच.आर.५० जी.बी.३०९९१ च्या चालकाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात संभाजी वाघमारे समराळेकर यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती समजताच धर्माबाद पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातानंतर फरार होण्याचा प्रयत्न करणाऱ्या ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या गंभीर घटनेनंतर स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कारणीभूत ठरलेल्या संबंधित ट्रक चालकाविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत संभाजी वाघमारे यांचा मृतदेह रात्रीच शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, कायदेशीर प्रक्रियेनंतर तो नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. धर्माबादमधील मुख्य रस्त्यांच्या कडेला असणारे वाहन तात्काळ हटवण्यात यावी व परिसरातील अंतर्गत मार्गांवर अवजड वाहनांची वेगाने होणारी वाहतूक थांबवावी आणि तेथे कायमस्वरूपी गतिरोधक किंवा सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी तीव्र मागणी या घटनेनंतर स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## डॉक्टरांना मारहाण;नगरसेवक म्हात्रेला जामीन,पण राज्यातून हद्दपार

### मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय



मुंबई/प्रतिनिधी-डोंबिवलीतील सरकारी रुग्णालयात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे याला मुंबई उच्च न्यायालयाने कठोर अटींसह जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने म्हात्रेसह सर्व आरोपींना आरोपपत्र दाखल होईपर्यंत महाराष्ट्राबाहेर राहण्याचे आदेश देत राज्यात प्रवेश करण्यास मनाई केली आहे.

प्रभारी मुख्य न्यायाधीश रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती गौतम ए.आंखड यांच्या खंडपीठाने शुक्रवारी हा आदेश दिला. जामिनानंतर रमेश म्हात्रे यांचा मुक्काम गोव्यातील 'नाझरी रिसॉर्ट' येथे असेल. तसेच त्यांना दर मंगळवार, गुरुवार आणि शनिवार अंजुना पोलीस ठाण्यात हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. न्यायालयाने या प्रकरणाचा खटला कल्याण येथील फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान आरोपी पक्षाकडून कोणत्याही कारणासाठी वारंवार तहकुबीची मागणी करता येणार नाही, असे स्पष्ट करत खटल्याच्या जलद सुनावणीवर न्यायालयाने भर दिला.सर्व आरोपींचे पासपोर्ट जप्त करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. तसेच आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर राहण्यास परवानगी देण्याची सरकारी पक्षाची मागणी न्यायालयाने फेटाळली. ही व्हीआयपी वागणूक ठरणार नाही का? असा सवाल करत, केवळ अपवादात्मक परिस्थितीतच संबंधित न्यायालयाची परवानगी घेऊन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहता येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, खटला पूर्ण होईपर्यंत सरकारी पक्षाचे वकील बदलू नयेत, असे निर्देशही न्यायालयाने दिले. या प्रकरणातील पीडित डॉक्टर हे कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या सेवेत असल्याने, न्यायालयीन सुनावणीसाठी उपस्थित राहिल्यामुळे त्यांच्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई केली जाणार नाही, अशी हमी केडीएमसीच्या वकिलांनी न्यायालयात दिली.डॉक्टरांवरील हल्ल्याच्या या गाजलेल्या प्रकरणात उच्च न्यायालयाने जामीन मंजूर करतानाच आरोपींवर कठोर निर्बंध लादल्याने न्यायालयाचा खटल्याच्या निष्पक्ष आणि जलद सुनावणीवर असलेला भर अधोरेखित झाला आहे.

## जॉनीच्या एक्झिटनंतर पैनगंगा अभयारण्याला मिळाला नवा राजा!

### वाघ-वाघिणीच्या मिलनाचा दुर्मिळ व्हिडिओ व्हायरल



उमरखेड/प्रतिनिधी-पैनगंगा अभयारण्यातून वन्यजीव प्रेमींसाठी अखेर गोड बातमी येण्याची चिन्हे दिसत असून, ज्याची सर्व वन्यप्रेमी आतुरतेने वाट पाहत होते,त्या वन विभागाच्या अतिशय गुप्त आणि महत्त्वाकांक्षी मोहिमेला अखेर एकंबाच्या घनदाट जंगलात यश आले असून अभयारण्याला आता खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अभयारण्यातील वाघांचे साम्राज्य पुन्हा उभे करण्यासाठी वन विभागाने पेंच व्याघ्र प्रकल्पातून एक वाघीण आणली होती. तिची गाठ अभयारण्याचा 'डॉन' मानल्या जाणाऱ्या 'जॉनी' वाघाशी घालून देण्याचा प्लॅन होता. पण ऐन वेळी निसर्गाने डाव फिरवला आणि बलाढ्य जॉनी अचानक बेपत्ता झाला. त्यामुळे संपूर्ण वंशवृद्धीचा प्लॅनच बारगळल्यात जमा होता. परंतु वन विभागाने हार मानली नाही.

**वनविभागाचे पडद्यामागचे 'ऑपरेशन वाघ'**

जॉनी गायब झाल्याची बातमी गुप्त ठेवत, वन्यजीव विभागाने तातडीने दुसरी चाल खेळली. पेंचमधूनच एका देखण्या आणि ताकदवान नर वाघाला अत्यंत गोपनीय पद्धतीने पैनगंगा अभयारण्यात आणण्यात आले. ही ट्रान्सलोकेशन मोहीम इतकी गुप्त होती की, विभागातील मोजक्याच अधिकाऱ्यांना याची माहिती होती.

**आणि या गुप्त मोहिमेचे चीज झाले!**

एकंबाच्या जंगलातील कच्च्या रस्त्यावर या नव्या जोडीचा एक अत्यंत दुर्मिळ व्हिडिओ नुकताच ट्रॅप कॅमेऱ्यात कैद झाला आहे. हिरव्यागार निसर्गाच्या कुशीत दोघे एकमेकांशी बागडताना, एकमेकांवर प्रेमाने डरकाळ्या फोडताना आणि अक्षरशः 'रासलीला' करताना दिसत आहेत. त्यांच्या प्रेमाच्या डरकाळ्यांनी अवघे एकंबाचे जंगल दणाणून गेले आहे.

वन अधिकाऱ्यांच्या मते, नर आणि मादीमधील ही जवळीक ही वंशवृद्धीची पहिली पायरी आहे. जर सर्व काही सुरळीत राहिले, तर येत्या काही महिन्यांतच पैनगंगा अभयारण्यात छोट्या, गोंडस बछड्यांच्या पावलांनी जंगल पुन्हा गजबजून जाईल, आणि मागील तीन वर्षांपासून शांत असलेल्या पैनगंगा अभयारण्याला आता खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येणार असल्याचे चित्र दिसून येईल.

# अप्रामाणिक कोण?

**देशातील तरुण पिढीबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलेले विधान सध्या राजकीय आणि सामाजिक चर्चेचा विषय ठरले आहे. ''झेन जी आणि झेन अल्फा ही पिढी सर्वाधिक प्रामाणिक आहे,'' असे त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हटले. तरुणांवरील हा विश्वास स्वागतार्ह असला, तरी या विधानातून एक गंभीर प्रश्न उभा राहतो; जर देशातील तरुणच सर्वाधिक प्रामाणिक असतील, तर त्यांच्या रोषाला आणि असंतोषाला जबाबदार अप्रामाणिक कोण? गेल्या बारा वर्षांपासून केंद्रात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली सरकार आहे. या काळात ''नवा भारत'', ''स्टार्टअप इंडिया'', ''डिजिटल इंडिया'', ''स्किल इंडिया'' अशा अनेक योजनांद्वारे तरुणांना विकासाच्या केंद्रस्थानी असल्याचा संदेश देण्यात आला. परंतु वास्तवात बेरोजगारी, भरती प्रक्रियेतील विलंब, वारंवार होणाऱ्या स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटी, प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ आणि गुणवत्तेपेक्षा व्यवस्थेवरील अविश्वास यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता वाढत गेली. कोणत्याही देशाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची तरुणाई. परंतु जेव्हा हीच तरुणाई आपल्या भविष्याबद्दल असुरक्षित वाटू लागते, तेव्हा त्याचे परिणाम केवळ राजकारणापुरते मर्यादित राहत नाहीत; ते संपूर्ण समाजव्यवस्थेवर उमटतात. स्पर्धा परीक्षा देणारा विद्यार्थी अनेक वर्षे मेहनत घेतो. पेपरफुटीमुळे त्याची मेहनत वाया जाते. भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडते. न्यायासाठी आंदोलने करावी लागतात. अशा परिस्थितीत व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे.अलीकडील काळात विद्यार्थ्यांच्या विविध आंदोलनांनी हा असंतोष स्पष्टपणे समोर आणला. आंदोलक विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर कठोर कारवाई झाल्याच्या घटनांवरूनही प्रश्न उपस्थित झाले. लोकशाहीत आंदोलन हे असंतोष व्यक्त करण्याचे वैध माध्यम मानले जाते. त्याला प्रतिसाद म्हणून संवाद, उत्तरदायित्व आणि विश्वासाची पुनर्स्थापना अपेक्षित असते. केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत प्रश्न पाहिल्यास मूळ समस्या सुटत नाही. मोहन भागवत यांनी तरुणांना ''प्रामाणिक'' म्हटले, याचा अर्थ त्यांच्या मनातील प्रांजळपणा, मेहनतीवरचा विश्वास आणि बदल घडवण्याची इच्छा त्यांनी मान्य केली आहे. परंतु जर हीच तरुण पिढी वारंवार व्यवस्था, परीक्षा, रोजगार आणि संधी यांच्या बाबतीत प्रश्न विचारत असेल, तर त्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी कोणाची? सरकार, प्रशासन, परीक्षा घेणाऱ्या संस्था आणि धोरणकर्ते यांना या प्रश्नापासून दूर जाता येणार नाही.अर्थात, सर्व दोष एका सरकारवर किंवा एका संस्थेवर टाकून समस्येचे निराकरण होणार नाही. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, प्रशासकीय निष्काळजीपणा, भ्रष्टाचार, न्यायालयीन विलंब आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांचा एकत्रित परिणाम तरुणांच्या भविष्यावर होत असतो. त्यामुळे दोषारोपांच्या पलीकडे जाऊन उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक आहे.आजच्या तरुणाला भाषणे नकोत; त्याला पारदर्शक व्यवस्था, वेळेत परीक्षा, वेळेत निकाल, वेळेत नियुक्ती आणि गुणवत्तेला न्याय हवा आहे. त्याच्या प्रामाणिकपणाचा गौरव करायचा असेल, तर त्याच्या मेहनतीचा सन्मान करणारी व्यवस्था उभी करावी लागेल. अन्यथा ''तरुण प्रामाणिक आहेत'' हे विधान केवळ टाळ्यापुरते मर्यादित राहील. मोहन भागवत यांच्या विधानाने एक महत्त्वाचा आरसा समाजासमोर ठेवला आहे. त्या आरशात जर तरुण प्रामाणिक दिसत असतील, तर व्यवस्थेने स्वतःचाही चेहरा पाहण्याची वेळ आली आहे. कारण तरुणांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा केवळ राजकीय प्रश्न नाही; तो देशाच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्यामुळे ''प्रामाणिक कोण?'' या प्रश्नाइतकाच महत्त्वाचा प्रश्न आता असा आहे, अप्रामाणिकपणाची जबाबदारी स्वीकारणार कोण?**

# इंजिनिअरिंगची बडेजावगिरी, पण वाढतेय बेरोजगारी!

इंजिनिअरिंग करूनही जॉब (नोकरी) मिळत नसल्याने अनेक विद्यार्थी आणि त्यांचे पालक आजच्या घडीला त्रस्त आहेत. इंजिनिअरिंगनंतरही जॉब मिळत नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी



लाखोंच्या घरात असूनही या वास्तवाकडे अनेकजण खुलेआमपणे डोळेझाक करत आहेत. समाजात चार लोकांपुढे सांगताना इंजिनिअरिंग हे पाल्य तसेच पालकांसाठी उच्च प्रतिष्ठेचे (स्टेटस सिम्बॉल) ठरत असले तरी हीच बडेजावगिरी अनपेक्षितपणे बेरोजगारीकडे ढकलत आहे. इंजिनिअरिंग केल्यानेच अच्छे दिन येणार, या मायाजालातून विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनी आता बाहेर पडण्याची गरज आहे.

इंजिनिअरिंगचे (अभियांत्रिकी) शिक्षण आपल्याकडे समाजात प्रतिष्ठा, उज्ज्वल भविष्य आणि उत्तम आर्थिक स्थैर्याचे प्रतीक मानले जाते. एकेकाळी इंजिनिअरिंगची पदवी म्हणजे लाखभर रुपयांच्या पगाराची नोकरी हे समीकरण होते. परंतु, आता मात्र हे समीकरण पूर्णपणे बदलले आहे. केवळ इंजिनिअरिंगच्या पदवीच्या जोरावर नोकरी मिळवणे, हे सध्या परिस्थितीत काही शक्य राहिलेले नाही. इंजिनिअरिंगच्या शिक्षणात उत्तम ग्रेड (श्रेणी) असेल तरच कॅम्पसमधून जॉब मिळतो. ओ (आऊटस्टँडिंग (अतिउत्कृष्ट)), ए प्लस (एक्सलेंट (उत्कृष्ट), ए (व्हेरी गुड (अतिउत्तम)), बी पल्स (गुड (उत्तम)), बी (एव्हरेज(सर्वसाधारण)), सी/पी (पास (उत्तीर्ण)) अशा प्रकारच्या श्रेणी असतात. टीसीएस, इन्फोसिस यांसारख्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अव्वल दर्जाच्या कंपन्या केवळ ओ आणि ए प्लस ग्रेडस्च्या विद्यार्थ्यांनाच नोकऱ्या देण्यास प्राधान्य देतात. यांपेक्षा कमी ग्रेडस्च्या विद्यार्थ्यांनाही जॉबच्या ऑफर असतात. परंतु, मिळणाऱ्या कंपनीचा प्रकार आणि पॅकेज (वेतन) यांत फरक असतो. असे जॉब करण्यासाठी अनेकजण अनुत्सुकता दाखवतात.

आपण कॅम्पसपेक्षा बाहेरून जॉब करू, या प्रयत्नांत ते असतात. थोडक्यात याचे फलित हेच की, केवळ इंजिनिअरिंगच्या पदवीच्या जोरावर नाही तर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या ग्रेडस्वर नोकऱ्या मिळतात. ज्या विद्यार्थ्याला चांगले ग्रेड नसतात त्यांना मात्र कॅम्पसमधून जॉब मिळत नाही. पदवी असूनही नोकरी मिळविण्यासाठी त्यांची भटकंती सुरू असते. इंजिनिअरिंगची पदवी असल्याने अनेकांना मोठ्या पगाराची अपेक्षा असते. विद्यार्थ्यांसह त्यांचे पालकदेखील याच आविर्भावात वावरत असतात. परंतु, इंजिनिअरिंगच्या पदवीच्या जोरावर चांगल्या कंपनीत मोठा पगार मिळणे सोडा, नोकरी मिळविणेही इतके आव्हानात्मक झाले आहे की ५ ते १० जागांसाठी शेकडो आणि हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांचे अर्ज असतात. भारतात दरवर्षी सुमारे १५ लाख इंजिनिअरिंग पदवीधर बाहेर पडतात.

एआयसीटीई, नॅसकॉम आणि ॲस्पिरिंग माइंड्स/व्हीबॉक्स यांच्या विविध अहवालांनुसार, भारतात दरवर्षीच्या १५ लाख इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांपैकी केवळ ४० ते ४५ टक्के इंजिनिअर्स हे प्रत्यक्ष उद्योगांच्या गरजांनुसार नोकरीसाठी पात्र ठरतात. उर्वरित ५५ ते ६० टक्के विद्यार्थ्यांची इंजिनिअरिंगच्या क्षेत्रात जॉब मिळविण्यासाठी भटकंती सुरू होते. सुरुवातीला काही काळ इंजिनिअरिंगच्या क्षेत्रातच जॉब मिळविण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांचा अट्टाहास असतो. विशेष करून आयटी क्षेत्रात. अशा प्रकारे यशस्वी होण्याचे प्रमाण जेमतेम ५ ते १० टक्के आहे. परंतु, उर्वरित बहुतांश जणांना नोकऱ्याच मिळत नाहीत. आधीच इंजिनिअरिंगची पदवी मिळविण्यासाठी सर्वसामान्य कुटुंबीयांनी लाखो रुपये खर्च केलेले असतात. त्यामुळे विनानोकरीचे अधिक काळ तग धरून राहणेही शक्य नसते. त्यामुळे इंजिनिअरिंगची पदवी असूनही अनेक तरुण बीपीओ, कस्टमर सपोर्ट, सेल्स, मार्केटिंग, रिटेल्स आदी प्रकारचे जॉब मिळतात.

जे विद्यार्थी शिक्षणात हुशार नसतात, उत्तीर्ण होण्याइतके गुण मिळवून आपली वाणिज्य किंवा कला शाखेतील पदवी पूर्ण करतात त्या विद्यार्थ्यांच्या जोडीला इंजिनिअरिंगच्या पदवीधर विद्यार्थ्यांना काम करावे लागते. कामाचा अनुभव नसल्यामुळे पगारातही फार फरक नसतो. १५ ते २० हजारांच्या मानधनावर इंजिनिअर कंपन्यांमध्ये राबताना दिसतात. ही वेळ आल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालक निराश होतात. इतका पैसा खर्च करून, अफाट मेहनत करून पदवी मिळवूनही अशा प्रकारच्या नोकऱ्या कराव्या लागण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येते. मी इंजिनिअर आहे किंवा आमचा पाल्य इंजिनिअर आहे, असे बिरूद विद्यार्थ्यांसह पालकांना जरूर मिरवता येते. परंतु, प्रत्यक्षात मात्र त्यांची प्रत्यक्ष परिस्थिती मात्र ही सर्वसामान्य जॉब करणाऱ्या नोकरदारांसारखीच असते.

**रामचंद्र नाईक**

इंजिनिअरिंगसारख्या व्यावसायिक शाखेत पदवी मिळवूनही नोकरी न मिळण्यामागे अनेक कारणे आहेत. बहुतांश विद्यापीठांचा इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम आजही १० ते १५ वर्षे जुना आहे. जगात तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. आज उद्योगांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), डेटा सायन्स, क्लाउड कॉम्प्युटिंग, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे. मात्र, कॉलेजेसमध्ये आजही विद्यार्थ्यांना जुन्या आणि कालबाह्य झालेल्या सिद्धांतांचे धडे दिले जातात. अनेक ठिकाणी कॉलेजेसमध्ये प्रात्यक्षिकापेक्षा (प्रॅक्टिकल) थेओरेटिकल (सिद्धांत) अभ्यासाला महत्त्व दिले जाते. इंजिनिअरिंग हा प्रत्यक्ष हाताने काम करून शिकण्याचा विषय आहे. परंतु, आपल्या देशातील शिक्षण व्यवस्थाच अशी बनली आहे की, केवळ पुस्तकी ज्ञानाचे पाठांतर करून चांगले गुण मिळवायचे आणि नोकऱ्या मिळवायच्या हाच ट्रेंड बनून गेला आहे.

बॉलीवूडमधील प्रसिद्ध थ्री इडियट या सिनेमातदेखील हेच दाखविण्यात आले आहे. इंजिनिअरिंगच्या कौशल्यापेक्षा गुणांना प्राधान्य देण्याच्या शिक्षणव्यवस्थेच्या मर्मावर यात बोट ठेवण्यात आले आहे. बहुतांश इंजिनिअरिंगच्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट्स कसे बनवायचे याचे व्यावहारिक ज्ञान नसते. अनेकदा तर प्रोजेक्ट्स बाजारातून विकत घेऊन विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे इंजिनिअरिंगची पदवी असली तरी विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्षात काहीतरी नवे निर्माण करण्याचे कौशल्यच नसते. बऱ्याचदा गुणवत्तेमुळे हुशार दिसणारे विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या मात्र मुलाखतींमध्ये अपयशी होतात. त्यांना नोकऱ्याच मिळत नाहीत.

इंजिनिअरिंगची पदवी म्हणजे लाखभर रुपयांच्या पगाराच्या नोकरीचे समीकरण तसेच समाजात ते प्रतिष्ठेचे मानले जात असल्याने बहुतांश विद्यार्थी, पालकांचा ओढा हा त्याकडे होता. अनेक विद्यार्थी आणि पालकांचा ओढा याकडे असल्याने येथूनच शिक्षणाचे व्यापारीकरण सुरू झाले. गेल्या दोन दशकांत खासगी इंजिनिअरिंग कॉलेजेसचे पेव फुटले. शहरांपासून गावांपर्यंत इंजिनिअरिंग कॉलेजेस मोठ्या प्रमाणात उभी राहू लागली. या महाविद्यालयामंध्ये अभियांत्रिकीचे दर्जेदार शिक्षण मिळेल की नाही, याचा कोणताही सारासार विचार न करता तसेच कोणत्याही पुरेशा सोयीसुविधा, तज्ज्ञ प्राध्यापक आणि लॅब्स (प्रयोगशाळा) नसतानाही त्यांना मान्यता देण्यात आल्या. सरकारी महाविद्यालयांमध्ये जागा भरल्या गेल्यानंतर खासगी महाविद्यालयांमध्ये इंजिनिअरिंगच्या जागा शिल्लक राहत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी तेथे प्रवेश घेण्यास सुरुवात केली. येथून विद्यार्थ्यांना पदव्या तर प्राप्त झाल्या. मात्र, अनेकांना दर्जेदार शिक्षण मिळाले नाही. तसेच, ज्या प्रमाणात इंजिनिअरिंगसाठी ॲडमिशनच्या जागा उपलब्ध झाल्या, त्या तुलनेत नोकऱ्यांच्या जागा वाढल्या नाहीत. त्या तितक्याच राहिल्या. परिणामी, अनेक इंजिनिअर पदवीधर निर्माण झाले खरे परंतु, बेरोजगारी वाढली. आजच्या घडीला बेरोजगारीमध्ये इंजिनिअरिंगचे क्षेत्र आघाडीवर मानले जाते. ही समस्या सोडवण्यासाठी सर्वात प्रथम विद्यार्थी आणि पालकांना आता जागरूक राहणे गरजेचे आहे. केवळ इंजिनिअरिंगनेच आपल्या पाल्याचे भले होणार, या गैरसमजातून त्यांना बाहेर पडावे लागेल.

इंजिनिअरिंगपेक्षाही बँकिंग, फार्मा, केमिकल इंडस्ट्री आदी विविध प्रकारची क्षेत्रेही महत्त्वाची असून तेथेही अनेक जण प्रगती कशाप्रकारे करत आहेत, याकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे. पालकांसोबतच शैक्षणिक संस्था, सरकार, उद्योजक या सर्वांनाच एकत्र येऊन पावले उचलावी लागतील. याबाबत जनजागृतीही करणे आवश्यक आहे. बी.ई. इंजिनिअरिंगची पदवी निरुपयोगी झाली आहे का? या प्रश्नाचे उत्तर नाही असेच आहे. तंत्रज्ञान संपूर्ण जगाला चालवत आहे आणि इंजिनिअर्सची गरज जगाला कायम राहणार आहे. परंतु, फक्त पदवी असलेल्या इंजिनिअर्सची गरज आता उरलेली नाही. तर, कौशल्य असलेल्या इंजिनिअर्सची गरज निर्माण झाली आहे. याची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये असेल तरच तेथे प्रवेश करणे योग्य ठरेल. सध्याचा काळ हा अत्यंत आव्हानात्मक आणि स्पर्धेचा आहे. जग अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. अशा परिस्थितीत जुन्या पद्धतीचे शिक्षण आणि विचार घेऊन पुढे जाणे आता शक्य नाही. त्यामुळे इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता स्वतःला आणखी कार्यक्षम बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. संशोधन वाढविण्यावर भर दिला पाहिजे. तसेच नवे काही तरी घडविण्याबाबत सामूहिकरित्या प्रयत्न करणे आवश्यक आहे. जर आपण वेळेनुसार बदललो, नवीन तंत्रज्ञान शिकलो आणि स्वतःची कौशल्ये विकसित केली, तरच इंजिनिअरिंगच्या क्षेत्रातही प्रगती नक्कीच करता येईल.

*- आपलं महानगरवरुन साभार.*


## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय व.स्तर,कंधार जि.नांदेड यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज २५५/२०२६
जयश्री भ्र.शंकरराव गिरे व ईतर वि.स्टेट बँक ऑफ इंडिया

प्रकरण : भारतीय वारसा कायदाच्या कलम १९२५ च्या कलम ३७२ नुसार वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

अर्जदार : १. जयश्री भ्र.शंकरराव गिरे, वय ५२ वर्ष धंदा घरकाम, २. गिरीष पि.शंकरराव गिरे, वय २७ धंदा नौकरी, ३. सौरभ पि.शंकरराव गिरे, सर्व रा.गउळ ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : १. स्टेट बँक ऑफ इंडिया (नविन)
स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (जुनी)
शाखा कंधार ता.कंधार जि.नांदेड तर्फे शाखाधिकारी

हे की, अर्जदार नं.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई असून अर्जदार क्र.२ व ३ आपसात सख्खे भाउ आहे.

हे की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे शंकर दशरथ गिरे हे होते ते दिनांक १०/०७/२०२१ रोजी शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी नांदेड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे गिरजाबाई दशरथ गिरे ही होती ती यापूर्वीच मयत झालेली आहे.

हे की, मयत शंकर दशरथ गिरे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

हे की, मयत शंकर दशरथ गिरे यांनी त्यांच्या हयातीमध्ये कोणत्याही प्रकारचे मृत्युपत्र किंवा इतर दस्ताऐवज लिहून ठेवलेले नाही.

हे की, मयत शंकर दशरथ गिरे यांनी गैरअर्जदार बँकेमध्ये बचत खाते क्र.५२१७५२७६८८१ काढले होते. सदरील खात्यात मयताच्या नावाने रक्कम रुपये ५,६८,२३४/- (पाच लाख अडुसष्ट हजार दोनशे चौतीस रुपये) जमा आहेत. मयत शंकर दशरथ गिरे यांनी या रकमेबाबत कोणतेही दस्त लिहून ठेवले नव्हते.

हे की, गैरअर्जदार बँकेत दिनांक ०८/०७/२०२६ रोजी चौकशी केल्यावर वरील रक्कम त्यांच्याकडे जमा असलेबाबत माहिती दिली. अर्जदारांनी सदरील रक्कम अर्जदारांना द्यावी अशी बँकेकडे विनंती केली असता गैरअर्जदाराने कोर्टाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे सांगीतले.

तरी, प्रस्तुत प्रकरणी रुपये ५,६८,२३४/- (पाच लाख अडुसष्ट हजार रुपये दोनशे चौतीस रुपये) चे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून या न्यायालयात दि.१०/०९/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०५ माहे ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| स्वाक्षरित/- | आदेशावरुन<br>स्वाक्षरित/- |
|---|---|
| **क.लिपीक** | **अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय व.स्तर,कंधार | दिवाणी न्यायालय व.स्तर,कंधार |



## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-१००-०२४६६ दिनांक - २९/०४/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार महम्मद मेहराज महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा महम्मद मेहराज महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव महम्मद मेहराज महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २५/०८/१९९८ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



## जाहीर प्रगटन

मे.दुसरे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५६/२०२६
MHND

अर्जदार : १) सरस्वती भ्र.दत्तात्रय बोंबले वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा.लालवाडी ता.कंधार जि.नांदेड, २) ओमसाई पि. दत्तात्रय बोंबले वय २१ वर्षे, धंदा शिक्षण, रा.लालवाडी ता.कंधार जि.नांदेड, ३) कमलबाई भ्र.नामदेव बोंबले वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. लालवाडी ता.कंधार जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील कलम २ व ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील सदरील प्रकरणातील अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यांची आई असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.१ यांची सासु व अर्जदार क्र.२ यांची आजी आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ यांचे वडील व अर्जदार क्र.३ यांचा मुलगा नामे दत्तात्रय नामदेव बोंबले हे होते ते दिनांक १३/०८/२०२५ रोजी रेणुकाई मल्टिस्पेशालीटी हॉस्पीटल एल.आय.सी.ऑफिस जवळ प्रताप चौक नांदेड येथे मयत झाले आहेत अर्जदार यांचे म्हणने आहे की, अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांनी मयत दत्तात्रय नामदेव बोंबले यांचे वारस असल्याबाबत शासकिय व निमशासकिय कामासाठी म्हणुन वारस प्रमाणपत्राची अवश्यकता असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत दत्तात्रय नामदेव बोंबले यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिला मार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन योग्य तो हुकुम पारित केला जाईल. याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २५/०८/२०२६

आज रोजी दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| स्वाक्षरित/- | आदेशावरुन<br>स्वाक्षरित/- |
|---|---|
| **वरिष्ठ लिपीक** | **अधिक्षक** |
| सह दिवाणी न्यायालय<br>क.स्तर,कंधार | सह दिवाणी न्यायालय व.स्तर,कंधार |



## जाहीर प्रगटन

मे.दुसरे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७६/२०२६
MHND

अर्जदार : १) राहुल पि.गौतम निकाळजे वय ३० वर्षे, धंदा व्यापार, २) प्रवीण पि.गौतम निकाळजे वय २९ वर्षे, धंदा शिक्षण, ३) आनंद पि.गौतम निकाळजे वय २८ वर्षे, धंदा शिक्षण, ४) शुभम पि.गौतम निकाळजे वय २६ वर्षे, धंदा शिक्षण, वरील सर्व रा.बारुळ ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील कलम २ व ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील सदरील प्रकरणातील अर्जदार क्र.१ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडिल नामे गौतम पि.मुंजाजी निकाळजे हे होते ते दिनांक २६/१२/२०२५ रोजी डॉ.शंकरराव चव्हाण हॉस्पीटल, वैद्यकिय महाविद्यालय विष्णुपुरी नांदेड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे रमाबाई भ्र.गौतम निकाळजे हि होती ती दिनांक २५/०७/२००४ रोजी जे.जे.हॉस्पीटल मुंबई येथे मयत झाली आहे. अर्जदार यांचे म्हणने आहे की, अर्जदारांशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांनी मयत गौतम पि.मुंजाजी निकाळजे यांचे वारस असल्याबाबत शासकिय व निमशासकिय कामासाठी म्हणुन वारस प्रमाणपत्राची अवश्यकता असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत गौतम पि.मुंजाजी निकाळजे यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिला मार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन योग्य तो हुकुम पारित केला जाईल. याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ९/९/२०२६

आज रोजी दिनांक ४/८/२०२६ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| स्वाक्षरित/- | आदेशावरुन<br>स्वाक्षरित/- |
|---|---|
| **वरिष्ठ लिपीक** | **सहाय्यक अधिक्षक** |
| सह दिवाणी न्यायालय<br>क.स्तर,कंधार | सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार |


सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगाव शहरातील निकृष्ट रस्ते बांधणीवर नागरिकांचा संताप

## १४ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा




हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत सुरू असलेल्या रस्तेबांधणीच्या कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील आझाद चौक येथील सामाजिक कार्यकर्ते शेख सलीम शेख रसूल यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना निवेदन देऊन स्मशानभूमी, पोलीस कॉलनी व तामसा रोडकडे जाणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई न झाल्यास १४ ऑगस्ट पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा शेख सलीम शेख रसूल यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, रस्त्याचे काम मंजूर अंदाजपत्रक व तांत्रिक निकषांनुसार होत नसून सिमेंटऐवजी मोठ्या प्रमाणात डस्ट पावडरचा वापर केला जात आहे. त्यामुळे काम सुरू झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच रस्त्यावर चिखल निर्माण झाला असून पोलीस कॉलनी, स्मशानभूमी तसेच परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच अंत्ययात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ता शेख सलीम यांनी हा विकास नसून शासनाच्या निधीची आणि जनतेच्या कररुपी पैशांची उघड उधळपट्टी असल्याचा आरोप केला आहे. गेल्या चार-पाच वर्षांत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील अनेक विकासकामांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून त्या सर्व कामांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.संबंधित रस्त्याची तातडीने तांत्रिक तपासणी करून दोषी ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करावी तसेच नियमानुसार रस्त्याचे पुनर्बांधकाम करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती पंतप्रधान कार्यालय, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री, नांदेड जिल्हाधिकारी तसेच हदगाव नगर परिषद मुख्याधिकारी यांनाही पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, कोट्यवधी रुपयांच्या सरकारी विकासकामांवर योजनेचे नाव, मंजूर निधी, कामाची किंमत, ठेकेदाराचे नाव आणि कामाचा कालावधी दर्शविणारा माहिती फलक लावणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी असे फलक दिसून येत नसल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. त्यामुळे काम कोणत्या योजनेतून व किती निधीतून सुरू आहे, याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.काही प्रभावशाली व्यक्तींशी संबंधित ठेकेदारांना कामे देऊन मनमानी पद्धतीने कामे केली जात असल्याचा आरोपही स्थानिक नागरिकांनी केला आहे. अशा प्रकारांमुळे दर्जेदार कामाऐवजी तडजोड केली जात असून प्रशासनाकडून प्रभावी देखरेख होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या सर्व आरोपांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा संबंधित ठेकेदार यांची अधिकृत प्रतिक्रिया वृत्त लिहिपर्यंत प्राप्त होऊ शकली नव्हती. प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही तर १४ ऑगस्टपासून प्रस्तावित आमरण उपोषणामुळे हा प्रश्न अधिकच चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सुरज तेलंगे यांची सुरक्षा बलात निवड

नांदेड/प्रतिनिधी-लोहा तालुक्यातील बोरगाव (आ.) येथील युवा सामाजिक कार्यकर्ते सुरज गोविंदराव तेलंगे यांची महाराष्ट्र सुरक्षा बलामध्ये निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, अनेक अडचणी आणि सततच्या संघर्षाचा सामना करत सुरज तेलंगे यांनी आपल्या जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. अनेक वेळा परिस्थितीने त्यांची परीक्षा घेतली; मात्र त्यांनी कधीही हार मानली नाही. संघर्ष हा यशाचा पाया असतो हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले. समाजसेवेची आवड जपत त्यांनी युवकांना शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्याचे कार्य सातत्याने केले. आता महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड होऊन त्यांनी स्वतःचे व आपल्या गावाचे नाव अभिमानाने उंचावले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# आचार्य गजेंद्र चैतन्यजी महाराज यांच्या भागवत कथेचे आयोजन

कुंडलवाडी/(प्रतिनिधी)- कुंडलवाडी, येथील श्री महालक्ष्मी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.८ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

यंदा २४ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या सोहळ्याची दुसरी तपपूर्ती असून भागवताचार्य प.पू. आचार्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांच्या मुखातून दररोज दुपारी २ ते ५ श्रीमद् भागवत कथेचे पठण होणार आहे. दरम्यान सप्ताहात दररोज रात्री ९ ते ११



विविध नामवंत किर्तनकारांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यात ह.भ.प. विजय महाराज बोधले, ह.भ.प. रोहिदास महाराज, ह.भ.प. श्रीधर महाराज कासराळीकर, ह.भ.प. माऊली महाराज, ह.भ.प. तुकाराम महाराज, ह.भ.प. विलास महाराज गजगे, ह.भ.प. संतोष महाराज वनवे यांची कीर्तने होणार असून दि.१६ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते बारा या वेळात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. आचार्य बालयोगी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६.३० ते ९ वा. ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन, दुपारी २ ते ५ भागवत कथा, सायं ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व जागर असे नियोजन आहे. आयोजकांनी सर्व भाविकांनी या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# शिवणी आरोग्य केंद्रात नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन द्यावी-भोजराज देशमुख

किनवट/प्रतिनिधी-शिवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत मार्च महिन्यापासून परिचरचे पाचहीपदे रिक्त असून ती भरण्यात यावीत. आपत्कालीन सेवेतील १०२ च्या रुग्णवाहिकेची अत्यंत दुरावस्था झालीय. आदिवासी अतिदुर्गम भागातील लोकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने समस्या मार्गी लावण्याची मागणी पत्रकार भोजराज देशमुख यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी बी.सरवनन यांनी परवाच गाभा समितीच्या आढावा बैठक घेऊन आरोग्य विभागाला महत्वाच्या सूचना दिल्या. आ. भीमराव केरामांनींही एकिकृत आरोग्य वर्धिनीच्या बैठकीतही महत्वाच्या सूचना दिल्या. आता जिल्हा प्रशासन किती गांभीर्याने सेवा पुरविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणार हे पहायला मिळणार आहे



शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात परिसरातील रुग्णांची तर आवक असते परंतु हे केंद्र तेलंगणा राज्याच्या सीमेजवळ असल्याने सरहद्द परिसरातील रुग्ण सुद्धा उपचारासाठी येत असतात. नागरिक उपचारासाठी अवलंबून असतात. त्यामुळे येथील आरोग्य सेवेवर ताण वाढणे स्वाभाविक आहे. १ मार्च २०२६ पासून आरोग्य केंद्रातील परिचरांची पाचही पदे रिक्त आहेत.रुग्णांना स्ट्रेचरवर हलवणे, स्वच्छता राखणे आणि आपत्कालीन मदतीसाठी मनुष्यबळ उपलब्ध नाही. परिणामी, वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच ही कामे करावी लागत असून रुग्णसेवेला मोठा विलंब होत असल्याचे देशमुख यांचे म्हणणे आहे.आरोग्य केंद्रात १०२ ची रुग्णवाहिका उपलब्ध आहे मात्र दुरावस्था झालीय. गर्भवती महिलांना, वृद्धांसह अपघातग्रस्तांना पुढील उपचारासाठी जाताना धक्के बसून त्रास होतोय. म्हणून सर्व समस्या तातडीने मार्गी लावण्याची पत्रकार देशमुख यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आहे. या समांतर समस्या शिवणी आरोग्य केंद्रापुरत्या मर्यादित नाहीत तर तालुक्यातील बहुतांश आरोग्य केंद्रातील समस्या आहेत. गाभाच्या बैठकीत तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी काय आढावा अहवाल सादर केलाय ?, तालुक्यातील सर्वच समस्या त्यात अंतर्भूत केल्यात का ? यावरही खुप काही निर्भर असणार आहे.


## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११२३/२०२६
वंदना व इतर वि.निरंक

अर्जदार : १. वंदना भ्र.अरुण ओझा, वय : ४६ वर्षे धंदा : घरकाम, २. अथर्व पि.अरुण ओझा, वयः ०८ वर्षे धंदा : शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ रमेशचंद्र पि. रामविलास ओझा, वय : ७३ वर्षे धंदा : व्यापार, कुसुमदेवी भ्र. रमेशचंद्र ओझा, वय : ७२ वर्षे धंदा : घरकाम, सर्व रा. एसबीआय बँकेजवळ, नवीन मोंढा, नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत अरूण पि. रमेशचंद्र ओझा यांचे वारस आहेत. मयत अरूण पि. रमेशचंद्र ओझा यांचा दिनांक २९/१०/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा. अर्जदार क्र. ३ हे मयताचे वडील व अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १६/०९/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाहीं व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०६.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.२५९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१३/०२/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मिनाक्षी मोहन कुरवाडे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४८१/१०९-A-२ गट क्र.५३८ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **भगवान पि.दामाधर जडे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २९६५/२०२५ दि.१८.११.२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- शासकीय रस्ता, पश्चिमेस :- भगवान केरबाजी लंगडे, उत्तरेस :- पंडीत सखाराम लंगडे यांचा प्लॉट, दक्षिणेस :- दत्ता गणपत शिंदे यांचा प्लॉट

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.११०७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/८/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **तकिओद्दीन पि.लतीफोद्दीन काझी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **८१७/२१ गट क्र.८१७ प्लॉट क्र.२१** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **फसिओद्दीन पि. मिस्बाहोद्दीन काझी** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २८७/२०२५ दि.३०.१.२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.२२, पश्चिमेस :- ९ मिटर रुंद रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.०३, दक्षिणेस :- ९ मिटर रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## CHANGE IN NAME

My old name : **PANDIT NANDEDKAR** which now I am changing as, New Name **PANDIT VIRBHADRA NANDEDKAR** Hence, forth My All Correspondance will be done as per my New Name. Please consider that both Name person is same.

Address
Sai Sadan Behind Market Comittee,
New Mondha Nanded-431602 (MS)
Mobile :9404465494

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-१००-०२४६६ दिनांक - २९/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार नगरची महम्मद फजल महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा नगरची महम्मद फजल महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव नगरची महम्मद फजल महम्मद फारुख रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/१०/१९९२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.११०६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/८/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सय्यद जाबेर अली सय्यद मंजूर अली** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६६२/७५ व ६६२/७६ गट क्र.८२६ प्लॉट क्र.७५ व ७६** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहसिन बेगम भ्र. फजलूल हक मुसा** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १/११२२२/२०२५ दि.२९.१२.२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.७४ आहे, पश्चिमेस :- प्लॉट क्र.७७ आहे, उत्तरेस :- प्लॉट क्र.९७ व ९८ आहे, दक्षिणेस :- २० फूट रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.११०५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/८/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **गजानन लक्ष्मण डूमने** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४९५/११ गट क्र.५४५ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **महेंद्र माणिकराव सोनकांबळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २/६७८१/२०२६ दि.१३.७.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- पंडीत यांची जागा आहे, पश्चिमेस :- रामा घीसडी यांचे घर आहे, उत्तरेस :- डॉ.जडे यांचे घर आहे, दक्षिणेस :- १० फूट रुंद रस्ता आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.११०४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/८/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शेख इर्शाद पि.शेख बाखर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६७२/५ गट क्र.६७२ प्लॉट क्र.५** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **सय्यद वजीदूद्दीन पि.सय्यद तखीओदीन** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ६४८/२०२६ दि.१३.४.२०२६, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील नुरकॉलनी नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९ मिटर रुंद रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१२, उत्तरेस :- प्लॉट क्र.६, दक्षिणेस :- ९ मिटर रुंद रस्ता.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.११०३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/८/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शेख इर्शाद पि.शेख बाखर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८४/१६ गट क्र.५६६ प्लॉट क्र.१६** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मुसाखान पि.इसाखान पठाण** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ७११/२०२५ दि.१८.३.२०२५, २) बक्षीस पत्र :-३) वारसा हक्क :-४) वाटणी पत्र :-५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- १५ फूट रुंद रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१२, उत्तरेस :- १५ फूट रुंद रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१५

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# बाजार समितीतील सत्तासंघर्ष टोकाला;विशेष सभेवर प्रश्नचिन्ह

## सचिवांवरील कारवाईला ब्रेक?,१४ संचालक बडतर्फ

किनवट/प्रतिनिधी-बहूचर्चीत झालेल्या किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना निलंबित करुन संपूर्ण अधिकार गोठविण्यासाठी पणन संचालक शरद जरे यांनी ३ ऑगस्ट रोजी संचालक मंडळाला दिलेल्या निर्देशावरुन उपसभापतींच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या ८ ऑगस्ट रोजीच्या तातडीच्या विशेष सभेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसते. कारण, सभापतींनी प्राप्त अधिकाराचा वापर करून ७ जुलै रोजीच उपसभापतींसह चौदा संचालकांना बडतर्फ केल्यामुळे आता बैठक घेऊन निर्णय घेण्याचा अधिकार त्या चौदा संचालकांना पोहचतो का ?, हा कळीचा मुद्दा आहे. यदाकदाचित त्या चौदा संचालकांच्या उपस्थितीत ८ ऑगस्ट रोजीची बैठक घेतलीच तर सभापतींची नेमकी काय भूमिका असेल ? याकडे सर्वांचेच लक्ष लागून दिसते.

सभापतींच्या पत्रानुसार,नोटीस प्राप्त त्या चौदा संचालकांना, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध बँक खात्यांमधून रक्कमा काढण्याबाबतचा ठराव पारित करण्यास कारणीभूत ठरून, समितीच्या मालकीच्या मोठ्या रक्कमा वैयक्तिक नावाने काढून स्वतःसाठी वापरल्याचा घणाघात सभापतींनी केलाय. दरम्यान त्या संचालकांना ठराविक मुदतीत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याची संधी दिली होती. ३ जुलै रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. संचालिका कुसूम गणपत मुंडे आणि अनुसया मनोहर पेंदोर यांनी केलेल्या अर्जावरुन नोटीस बजावली होती. समितीसमोर उपलब्ध रेकॉर्ड, कामकाज, दस्तऐवज, संचालकांचे वर्तन व इतर साहित्याचे काळजीपूर्वक अवलोकन करण्यात आल्याचेही सभापती म्हणतात. समितीने सांभाळलेले रेकॉर्ड व कामकाजाच्या अवलोकनावरून असे दिसून येते की, संचालकांवरील आरोप सत्य व बरोबर आहेत. त्यांनी बहुमताचा गैरवापर केला, समितीच्या शिस्तीविरुद्ध कृत्य केले, समितीचे आर्थिक नियंत्रण विस्कळीत केले, समितीचा निधी वैयक्तिक नावावर काढण्यास परवानगी व पाठिंबा दिला, समितीच्या निधीचे संरक्षण करण्यात ते अपयशी ठरले आणि समितीच्या हितास व कायदेशीर प्रशासनास बाधा पोहोचेल असे वगैरे वगैरे कृत्य केल्याचा सभापतींनी गंभीर आरोप केलेत.समितीचा निधी सार्वजनिक स्वरूपाचा व विश्वासाचा आहे. कोणत्याही संचालकाला असा निधी वैयक्तिक फायद्यासाठी किंवा बहुमताच्या दबावाखाली काढण्याचा, वळवण्याचा, जवळ बाळगण्याचा, गैरवापर करण्याचा किंवा गैरवापरास परवानगी देण्याचा अधिकार नाही. संचालक आर्थिक पारदर्शकता राखण्यात आणि काढलेल्या रक्कमांचा योग्य कायदेशीर वापर उघड करण्यात अपयशी ठरले. बँक रेकॉर्ड, लेजर, कॅश बुक, व्हाऊचर्स, पेमेंट रजिस्टर्स, चेक, विड्रॉअल स्लिप्स आणि संबंधित कार्यालयीन दस्तऐवज सुरक्षित ठेवण्यास अपयशी ठरले. ज्यामुळे त्यांनी समितीच्या कायदेशीर आणि शिस्तबद्ध कामकाजात अडथळा निर्माण केल्याचे सभापतींच्या पत्रांत नमूद आहे. संचालकांचे हे वर्तन सामूहिक आणि संघटित स्वरूपाचे आहे. तक्रार केलेली कृत्ये ही एका व्यक्तीचे वैयक्तिक कृत्य नसून, ती सामूहिक बहुमताचा गैरवापर करणारी आहे. संचालकांनी विश्वस्त कर्तव्याचा व विश्वासाचा भंग केल्याने पदांवर राहण्याचा नैतिक, प्रशासकीय आणि कायदेशीर अधिकार त्यांनी गमावला आहे. म्हणून, सभापतींनी उप-नियम, नियम २९(३) अन्वये अधिकारांचा वापर करून चौदा संचालकांना दोषी ठरवून बडतर्फ केल्याचे पत्रात नमूद असून समितीच्या नोंदवहीत व कामकाजात आवश्यक त्या नोंदी कराव्यात आणि हा आदेश सर्व संबंधित अधिकारी, बँका व कार्यालयांना कळवावा. सक्षम प्राधिकारी, लेखापरीक्षण प्राधिकारी आणि योग्य कायदेशीर प्राधिकरणाकडे कायद्यानुसार पुढील कारवाईसाठी पाठवण्यात यावे, ज्यामध्ये चौकशी, ऑडिट, वसुली आणि आवश्यक कायदेशीर कारवाईचा समावेश असेल. असे सभापतींनी सचिवाला आदेशित केले आहे. सभापतींच्या पावित्र्यावरुन सचिव रवींद्र राठोड निर्दोष असून त्यांच्या पदाला जीवदान मिळण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे.

# मौ.हरबळ येथे तीन लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-मौ.हरबळ ता.कंधार येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी तीन लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

दशरथ शिवाजी घुगे (वय ४२) रा.हरबळ हे घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत बाहेरगावी गेले असतांना अज्ञात चोरट्यांनी बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा तीन लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरुध्द कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड- मुदखेड शहरातील भीमनगर परिसरात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर बुधवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन नऊ जणांना अटक केली. त्यांच्याकडून पोलीसांनी २ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

भीमनगर परिसरात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती मुदखेड पोलीसांना मिळाली. बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास जुगार अड्ड्यावर पोलीसांनी छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना मोहम्मद मुजीब मो.खाजा (वय २९) रा.आबादी, मुदखेड याच्यासह इतर आठ जणांना पोलीसांनी अटक केली. त्यांच्याकडून पोलीसांनी रोख रक्कम, सहा मोबाईल, दोन दुचाकी वाहन व इतर साहित्य असा २ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी नऊ जणांविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कीटकनाशक औषधाच्या फैलावाने दोन चिमुकलींचा मृत्यू

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरातील बाळापूर येथे किटकनाशक औषधाच्या फैलावाने दोन चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दि.६ ऑगस्ट रोजी घडली आहे.



चिमुकल्याचे वडील मल्लेश डेबेकर यांनी आपल्या राहत्या घरात हरभऱ्याच्या बियाण्याला कीड लागू नये म्हणून एका पोत्यात जहाल कीटकनाशक औषध मिसळून ठेवले होते. बुधवारच्या रात्री संपूर्ण कुटुंब याच खोलीत झोपले होते. रात्रीच्या वेळी खोली पूर्णपणे बंद असल्यामुळे त्या कीटकनाशकाचा तीव्र विषारी गॅस/वास संपूर्ण खोलीत पसरला. गुरुवारी पहाटेच्या सुमारास विषबाधा झालेले कळताच आई-वडिलांसह दोन्ही लहान मुलींना अचानक तीव्र उलट्या आणि छातीत गुदमरल्यासारखा त्रास सुरू झाला. डोळ्यांदेखत आरोही मल्लेश डेबेकर (वय ६), आराध्या मल्लेश डेबेकर (वय ४) दोन्ही चिमुकलीने प्राण सोडले. त्रास अत्यंत तीव्र असल्यामुळे, कोणतेही उपचार मिळण्यापूर्वीच गुरुवारी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास आरोही आणि आराध्या या दोन्ही सख्ख्या बहिणींचा आई-वडिलांच्या डोळ्यांदेखत मृत्यू झाला. गावावर शोककळा पसरली. मल्लेश डेबेकर यांना या दोनच मुली होत्या, एकाच वेळी दोन्ही चिमुकल्या मुली गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बाळापूर गावात अत्यंत शोकाकुल वातावरणात ग्रामस्थांच्या उपस्थितीत दोन्ही बहिणींवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# देगलूरमध्ये मटका अड्डयावर पोलीसांची धाड

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील रोहिदास चौक परिसरात सुरू असलेल्या 'श्रीदेवी 'मटका जुगार पोलिसांनी बुधवारी धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत एका आरोपी विरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

देगलूर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी गणेश बालाजी बोदेमेवाड यांच्या फिर्यादीवरून कैलास सुरेश हणमंतकर (वय ४० रा.पेट अमरापूर गल्ली) यांच्या विरुद्ध गणा क्रमांक,३६७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. रोहिदास चौक येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपी हा 'श्रीदेवी' नावाचा मटका जुगार खेळत व इतरांकडून खेळवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला.या कारवाईत आरोपीच्या ताब्यातून ९५० रुपये रोख रक्कम तसेच मटका जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.



नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष व पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक ॲड.प्रदीप नागापूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे,मा.जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मणराव मा.भवरे, अविनाश पाटील, महानगर कार्याध्यक्ष गजानन कानडे, आझमबेग,इम्रानखान आदी.

**पासपोर्ट हरवले**

माझे बाळासाहेब व्यंकटी भालेराव या नावाच पासपोर्ट ज्याचे क्रं.Z६३२६०३७ व इतर कागदपत्रे मुक्ताईनगर कंधार ते तहसील कार्यालय कंधार येथे मोटार सायकल वरून येत असताना माझ्या मोटार सायकल मध्ये ठेवलेल हारवले आहे. कुणास सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता :
**बाळासाहेब व्यंकटी भालेराव**
रा.मुक्ताईनगर कंधार ता.कंधार, जि.नांदेड.
मो क्रं.८३२९६३२०४८

# सागवान तस्करांचा थरार संपला;वनविभागाची धाडसी कारवाई

## पाठलागानंतर तिघे जेरबंद

किनवट/प्रतिनिधी-रात्रीच्या गस्ती दरम्यान वनविभागाच्या पथकाला चकवा देऊन पळून जाणाऱ्या आणि थेट वनविभागाच्या वाहनाला धडक देणाऱ्या सागवान लाकूड तस्करांच्या वनविभागाने अत्यंत हुशारीने मुसक्या आवळल्या आहेत. ही धाडसी कारवाई ६ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास बेंदीतांडा फाट्याजवळ करण्यात आली असून या प्रकरणी तीन आरोपींना मुद्देमालासह अटक करण्यात आलीय.

वनविभागाला त्यांच्या खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनंतर वनपथकाने चिखली बु. वनोपज तपासणी नाका परिसरात गस्त तेज केली. माहिती प्रमाणे बोधडी मार्गे चिखली येथील वनविभागाच्या नाक्यावरून सागवान लाकूड घेऊन एक कार आली. तत्पूर्वीच दबा धरून बसलेल्या पथकाला एक मोटरसायकल व तिच्या मागे कार येताना दिसली. कर्मचाऱ्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला मात्र भरधाव वेगाने आलेल्या कारने वनविभागाच्या गाडीलाच समोरुन धडक देवून किनवटकडे पळ काढला.वन कर्मचारी तेथून निघून गेले असावेत असे गृहीत धरून अंधाराचा फायदा घेत तस्करांची गाडी किनवटकडून परत चिखलीकडे निघाली. अन तत्पूर्वीच वन कर्मचाऱ्यांनी बेंदीतांडा फाट्याजवळ रचलेल्या सापळ्यात अकडले. दरम्यान शेख कासिम शेख उस्मान, शेख जावेद शेख रफीक आणि शेख सोहेल शेख शौकत यांना मुद्देमालासह अटक करण्यात आली. ७० हजार रुपये किमतीची एम.एच-२६- डीसी-२४२३ या नंबरची मोटारसायकल आणि ५० हजार रुपये किंमतीची एम.एच-- ए.सी-७२०३ या क्रमांकाची टाटा इंडिका कार आणि ३,६२९ रुपये किमतीचे सागवान लाकूड असा एकूण मुद्देमाल जप्त करून वनगुन्ह्याची नोंद करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.किनवटचे सहाय्यक वनसंरक्षक किरण चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने, फिरत्या पथकचे वनपरिक्षेत्र अधिकारी एन.एन.केंद्रे, बोधडीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सी.जी.पोतुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल बी.टी.जाधव, मनोज गुरसाळी, वनरक्षक रवी दांडेगावकर, अरुण चुकलवार, मारोती केंद्रे व चालक बाळकृष्ण आवले यांच्या पथकाने कारवाई केलीय.

पान १ वरुन

## पंतप्रधान मोदी-शिंदे...

खासदारांशी पंतप्रधान मोदी संवाद साधत असल्याचे स्वागत करत शिंदे म्हणाले, नवनिर्वाचित तरुण खासदार हे देशाचे भविष्य आहेत. विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधानांनी युवकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, आता त्यांना विकासाचा मंत्र देण्याचे काम सुरू आहे. संसदेतील गदारोळावर भाष्य करताना शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली. सरकार प्रत्येक विषयावर चर्चेसाठी तयार आहे; मात्र विरोधक चर्चेपासून दूर पळत असून संसदेचे कामकाज सुरळीत होऊ देत नाहीत. देशाच्या विकासापेक्षा त्यांना राजकारणात अधिक रस असल्याचे त्यांच्या भूमिकेतून दिसून येते, असा आरोप त्यांनी केला. या भेटी दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी शिंदे यांच्या नातवाच्या प्रकृतीचीही आपुलकीने चौकशी केली. या व्यक्तिगत संवादामुळे दोन्ही नेत्यांमधील स्नेहपूर्ण संबंध पुन्हा अधोरेखित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.दरम्यान, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीकडे राज्यातील सत्तासमीकरणे, विकासकामे आणि आगामी राजकीय रणनीतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण म्हणून पाहिले जात आहे.

## राज ठाकरेंकडून...

परिषदेत सुरुवातीलाच राज ठाकरे यांनी या प्रकरणावर भाष्य केले. दिलीप गावित यांना कोणी बोलावले होते, हेच मला माहीत नाही. ते आले आहेत, याची माहितीही मला कोणी दिली नव्हती. त्यामुळे त्यांना मुद्दाम भेटलो नाही, असा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी सांगितले.खेळाडूला एवढा वेळ थांबावे लागले आणि भेट होऊ शकली नाही, याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्यापर्यंत माहिती पोहोचली असती, तर मी त्यांची निश्चित भेट घेतली असती, असेही ठाकरे यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे यांनी दिलीप गावित सध्या दिल्ली दौऱ्यावर असल्याचे सांगत, ते दिल्लीहून परतल्यानंतर मी स्वतः त्यांची भेट घेईन आणि त्यांच्याशी या विषयावर चर्चा करीन, असे आश्वासन दिले. तसेच प्रसारमाध्यमांनीही हा संदेश दिलीप गावित यांच्यापर्यंत पोहोचवावा, अशी विनंती त्यांनी केली.दरम्यान, या स्पष्टीकरणानंतर आता दिल्लीहून परतल्यानंतर दिलीप गावित आणि त्यांचे प्रशिक्षक वैजनाथ काळे हे राज ठाकरे यांची भेट घेणार का, याकडे क्रीडा आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# रामजी वसुरे यांचे दुःखद निधन

मुदखेड/प्रतिनिधी-भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते व मेंडका येथील माजी सरपंच रामजी पाटील वसुरे यांचे हृदय विकाराने हैद्राबाद येथे उपचारा दरम्यान गुरुवार दि.६ ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले आहे.

त्यांच्या पार्थिव शरीरावर आज दि.७ ऑगस्ट रोजी त्यांचे राहत्या गावी मौजे मेंडका ता. मुदखेड जि. नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी कलावती बाई रामजी पाटील वसुरे, बालाजी, तानाजी, गोविंद असे तीन मुले सुना, एक मुलगी सौ. अर्चना सावंत गोरठेकर व जावई नातवंड असा परिवार आहे. रामजी पाटील वसुरे हे माजी आ. बाबासाहेब गोरठेकर, बापूसाहेब गोरठेकर, माजी नगराध्य राम चौधरी यांचे कट्टर समर्थक म्हनुन ओळखले जात. तसेच भाजपाचे जुने कार्यकर्ते म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध होते.

# जी.एस.जोंधळे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-होमगार्ड विभागातील सेवानिवृत्त केंद्रनायक जी.एस. जोंधळे (वय ७०) यांचे आज (शुक्रवार) दि.७ ऑगस्ट रोजी सकाळी अकस्मीक निधन झाले आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, दोन्ही मुली, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे. प्रशांत जोंधळे व सुधाकर पांढरे मित्र मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते सुशांत जोंधळे यांचे ते वडील होत.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०५/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख गौस शेख खलील रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा शेख जेहान गौस रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शेख जेहान गौस रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/१०/२०२४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०५/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-१००-०२४६६ दिनांक - २०/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार फारूक आजम महम्मद इब्राहिम रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा फारूक आजम महम्मद इब्राहिम रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव फारूक आजम महम्मद इब्राहिम रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०६/१९६४ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-१००-०२४६६ दिनांक - २०/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार अंतेश्वर विजय जाधव रा.चोळीतांडा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा अंतेश्वर विजय जाधव रा.चोळीतांडा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव अंतेश्वर विजय जाधव रा.चोळीतांडा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ११/०३/२००६ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०५/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार कालु गुलाबसाब बेग रा.मोहजी परांडा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.खदीर कालु बेग रा.मोहजी परांडा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव खदीर कालु बेग रा.मोहजी परांडा ता.कंधार या ठिकाणी दिनांक २९/०६/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०३/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ३१/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख इस्माईल सरवरसाब रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.बुशरा बेगम शेख महेमुद रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव बुशरा बेगम शेख महेमुद रा.हाळदा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०२/११/२००९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २८/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ३१/०७/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४